e-ISSN No. 2394-8426
Special Issue on Humanities And
Indian Knowledge System Feb'26
Issue–I(I), Volume–XIV

# आधुनिक कुटुंब रचनेतील भारतीय महिलांची बदलती भूमिका आणि भारतीय ज्ञान परंपरा

**विलास गणेशराव सुर्यवंशी**
समाजशास्त्र विभाग
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापिठ नागपूर

**सारांश**

भारतीय कुटुंब व्यवस्थाचा पाया पितृसत्ताक मूल्यांवर आधारीत राहिला असून स्त्रीची भूमिका कायम दुय्यम राहिली आहे. धर्म, रुढी, सामाजिक प्रथा आणि पुरुषप्रधान विचारसरणी मूळे स्त्रीयांना शिक्षण, संपत्तीवरील अधिकार, निर्णयस्वातंत्र्य व सामाजिक सहभागाच्या संधी मर्यादित मिळाल्या.

परंतू, सामाजिक जागृती, स्त्री-सुधारणा, शिक्षणाचा प्रसार, कायदे आणि रोजगार संधी मुळे स्त्री सक्षमीकरणाची प्रक्रिया जोमाने पुढे आली. स्त्रीयांचे आर्थिक स्वावलंबन वाढले, त्यांच्या निर्णयक्षमतेला, नेतृत्वाला आणि वैयक्तीक स्वातंत्र्याला नवा आयाम मिळाला. आधुनिक तंत्रज्ञान, घटनात्मक तरतुदी व समाजसुधारकांच्या प्रयत्नामुळे स्त्री-पुरुष समानतेची जाण वाढली असून कुटुंबव्यवस्थेत स्त्रीच्या भूमिकेचे पुनर्मुल्याकंन सुरु झाले आहे.

आज स्त्री पारंपारिक भूमिकेपलीकडे जावून शिक्षण, करिअर, व्यापार, राजकिय सहभाग आणि प्रशासकिय नेतृत्व सारख्या विविध क्षेत्रात सक्रियपणे सहभाग घेत आहे. स्त्रीच्या भूमिकेतील बदल हा समाजाच्या समृध्दीचा, प्रगतीची आणि ज्ञानपरंपरेतील परिवर्तनाचा महत्वपुर्ण निर्देशांक ठरतो.

**मुख्य शब्द(Keywords)** :- भारतीय कुटुंबव्यवस्था, पितृसत्ताक व्यवस्था, स्त्री-भूमिका, स्त्री-पुरुष समानता, सामाजिक विकास**.**

**प्रस्तावना**

भारतीय ज्ञानपरंपरेनसार कुटुंबव्यवस्थेचा पाया हा संस्कार, कर्तव्य, परस्परावलंबन तसेच धर्म, अर्थ, काम व मोक्ष या पुरुषार्थावर आधारीत राहीला आहे. (शर्मा, २०१६, पृ.४२). प्राचीन काळापासून कुटुंब व्यवस्था टिकवून ठेवण्यात महिलांची भूमिका कायम शिर्षस्थानी राहीली आहे. तरीही भारतीय समाजात महिलांच्या कौटुंबिक दर्जा बद्दल कमालीचा विरोधभास राहीलेला आहे. येथे सरस्वती ही विदयेची देवता, लक्ष्मी ही धनाची देवता आणि दुर्गा ही शक्तीची देवता म्हणून उदो उदो केला जातो. स्त्रीला सोईनुसार पूजले जाते, देवता म्हणून देव्हा-यात बसविले जाते तर दुसरीकडेपायाची दासी, गुलाम, व उपभोग्य वस्तू म्हणून अत्याचार आणि शोषण. (अळतेकर १९५९, पृ. १८-२२).

पितृसत्ताक कुटुंबव्यवस्था प्रचलीत असल्यामुळे स्त्रीला कौटुंबिक अधिकारापासून वंचित ठेवले. स्त्रिंयाच्या स्वातंत्र्यावर बंधने घालणारा "मनू" या मूलभूत तत्वाने सुरुवात करतो की, "पिता रक्षति कौमारे भरता रक्षति यौवने| रक्षन्ति स्थाविरे पुत्रा: न स्त्री स्वातंत्र्य महीति ||" अर्थात महिलांना त्यांच्या कुटुंबातील पुरुषानी दिवसरात्र नियंत्रणात ठेवले पाहिजे. वडिल बालपणात तिचे रक्षण करतात, नवरा तारुण्यात तिचे रक्षण करतो आणि मुलगे म्हातारपणी रक्षण करतात, स्त्री कधीही स्वतंत्रपणे जगण्यास योग्य नसते." याच्याही पुढे तो म्हणतो की, निर्मात्याने तिच्यात शारीरिक वासना, अलंकाराबद्धल प्रेम, अशुध्द इछा, क्रोध, अप्रामाणिकता द्वेष आणि वाईट आचरण बिंबवले. (मनुस्मृती अध्याय ५, पृ.१४८).

ज्या समाजात स्त्रियांचा दर्जा जोपासला जातो त्या समाजाचा विकास जलद गतीने होत असतो, हे सांगताना विख्यात समाजशास्त्रज्ञ हर्बर्ट स्पेन्सर म्हणतात की, "समाजाची प्रगती अथवा अधोगती, विकसितपणा अथवा मागसलेपणा हा मुख्यता त्या समाजातील स्त्रियाना दिल्या जाणा-या वागणूकीवर अर्थात सामाजिक दर्जावर अवलंवून असतो." (हर्बर्ट स्पेन्सर- १८७६. पृ.४१६-४१७). तर डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात की, "I measure the progress of community by the degree of progress which women have achieved." समाजात स्त्रीची कितपत प्रगती झाली यावरुन मी त्या समाजाच्या प्रगतीचा आलेख ठरवतो. (आंबेडकर १९७९, पृ.१५).

स्त्री-पुरुष समानतेकडे झुकणारी आधुनिक कुटुंबव्यवस्था घडण्यास डॉ. बाबासाहेब आंबेडकरानी केलेल्या संविधानीक तरतूदी, शैक्षणिक हक्क, कायदे, आणि आधुनिक तत्रंज्ञान आणि सामाजिक आंदोलने यामुळे आज स्त्रीया करिअर, निर्णयक्षमता, आर्थिक योगदान आणि कुटुंबातील नेतृत्व या सर्व क्षेत्रात सक्रिय होत आहेत. (सुब्रमण्यम १९८५, पृ. १४२-१५४).

सदर अभ्यसातून भारतीय महिलांच्या प्राचीनकाळातील कौटुंबिक भूमिका आणि आधुनिक काळातील कौटुंबिक भूमिका व त्या पार पाडत असताना येणा-या विविध आव्हानाचा आढावा घेण्यचा लेखाजोखा केला आहे.

**उध्दिष्टे**

१.भारतीय कुटुंब व्यवस्थेत स्त्रीची पारंपारिक भूमिका आणि आव्हांनाचा अभ्यास करणे.
२. पितृसत्ताक व्यवस्थेचा स्त्रीचे शिक्षण, स्वातंत्र्य आणि सामाजिक स्थाना वरील परिणाम अभ्यासने.
३.आधुनिक काळातील शिक्षण, कायदे आणि स्त्री-सुधारणा मुळे स्त्री भूमिकेत झालेले बदल ओळखणे.

**संशोधन पध्दती**

प्रस्तुत शोधप्रबंध हा दुय्यम स्त्रोतांवर आधारित असून विविधपुस्तके, संशोधन निबंध, जर्नल्स, सरकारी अहवाल, जनगणना अहवाल, सामाजिक सुधारकांच्या साहित्याचा आणि विश्वसनिय ऑनलाइन स्त्रोतांचा अभ्यास करुन माहिती संकलित केली. सदर संशोधन हे गुणात्मक आणि वर्णनात्मक स्वरुपाचे असून साहित्यआधारित विश्लेषणावर केंद्रित आहे.

**प्राचीनकाळातील महिलांच्या कौटुंबिक भूमिका**

**सहचारिणी**

पितृसत्ताक कुटुंब व्यवस्थेत पत्नी म्हणून दुय्यम स्वरुपाची कामे करण्यास भाग पाडल्या गेले. स्त्रीला पुरुषाची सेवा करणे, मुले जन्माला घालणे, खानपान, घर सांभाळणया पलीकडे फारसे अधिकार नव्हते. एकप्रकारे कुटुंबात स्त्रीला धार्मिक आणि रुढी-परंपरेच्या बंधनात अडकवून तिच्यावर दास्यत्व लादले गेले. (शर्मा, २००७, पृ. ५२-५४). याज्ञवलक्य स्मृतीमध्ये पतीचे स्थान स्त्रीच्या जीवनातील सर्वोच्च असल्याचे प्रतिपादन आढळते. याज्ञवलक्य म्हणतो की, एका महिलेसाठी तिचा पती सर्वकाही असावा त्याच्यावरील भक्ती आणि प्रेमाद्वारे, ती तिचे कर्तव्य पूर्ण करते. (Yajnavalkya Smriti, as cited in Kane, 1962. pp.370-372).

मनुस्मृतीने स्त्रीचे कर्तव्य पतीभक्तीशी जोडलेले आहे. मनू असे म्हणतो की, "पतिस्त्रीणा परं दैवतम्" म्हणजे स्त्रीने दृष्ट पतीची पूजा केली पाहिजे, जरी पती वाईट चारित्र्याचा असला, जरी तो इतरत्र सुख शोधत असला तरी, विश्वासु पत्नीने त्याची सतत देव म्हणून पूजा केली पाहीजे. जी पत्नी रागाच्या भरात पतीच्या घरातून निघून जाते, तिला ताबडतोब बंदिस्त करावे किंवा कुटुंबातून काढून टाकावे. (मनुस्मृती आध्याय ५, पृ.१५४).

**शिक्षण विषयक**

वैदिककाळात घोषा, विश्ववारा, अपाला, लोपामृद्रा सारख्या विदवान स्त्रिया होत्या तर कुंतला, रुक्मिनी या उत्तम कवयित्री असून धर्म, तत्वज्ञान, नृत्य व संगीताचे शिक्षण देणा-या विदुषी म्हणून प्रसिद्ध होत्या. मैत्रेयी, गार्गी, सुलभा व वाक्यनवी या स्त्रिया विदयेत प्रविण होत्या. कैकेयी, इंद्रसेना, विश्र्वला व सत्यभामा या स्त्रिया युध्दशास्त्रात निपून होत्या. (अळतेकर,२०१६,पृ.१७-२०).

वर उल्लेखित स्त्रिया उच्चवर्णिय किंवा कुलीन होत्या. बहुसंख्य स्त्रीया शिक्षणा पासून कोसो दुर होत्या कारण विदया ग्रहण करण्यासाठी उपनयन संस्कार किंवा पवित्र धागा (जो एखाद्या व्यक्तीला शिक्षणात दीक्षा देण्यासाठी बांधला जात असे) हा संस्कार करणे आवश्यक होते. परंतू मनू च्या नियमानूसार उपनयन संस्कार महिला आणि शुद्रांसाठी निषिध्द होता. (शर्मा, २०१८, पृ.१०४-१०५). ऋगवेदात इंद्र म्हणतो कि, स्त्रीयाना उपजतच कमी बुध्दिमत्ता असते, ती ज्ञान ग्रहण करु शकत नाही.

**विवाह विषयक**

पितृसत्ताक कुटुंब व्यवस्थेत कुटुंबातील प्रमुख निर्णय हे वडिलांच्या किंवा घरातील जेष्ठ पुरुषांच्या हातात असत. त्यामुळे विवाहासारखा महत्वपुर्ण निर्णय मुलीना घेण्याचा अधिकार नव्हता. वडिल किंवा कुलमुख्यांनी निश्चित केलेल्या वरा-सोबतच मुलीचा विवाह लावून दिला जात असे. स्त्रीचा एकदा विवाह झाला की, तीने दुसरा विवाह करु नये असे धार्मिक बंधने लादण्यात आले. (आपटे, २०१९, पृ. ११२-११३). वेदकाळात मात्र पुरुषानी अनेक बायकांशी लग्न करण्याचा प्रघात होता. असे असले तरी उच्चवर्णाचा शुद्रवर्णाशी विवाह मान्य नव्हता. मैत्रेयणी संहितेत मनूच्या दहा बायकांचा उल्लेख आढळतो तर ऐतरेय ब्राम्हणात हरिश्चंद्राला शंभर बायका होत्या असे म्हटले आहे. तर श्रीकृष्णाला १६ सहस्त्र बायका होत्या. मात्र स्त्रिला एकच पती असला पाहिजे असे वेदात म्हटले आहे. (देसाई, २०२०, पृ.७४-७५).

**बालविवाह विषयक**

प्राचीन काळात बालविवाह ही एक कुप्रथा होती**,** रजोदर्शनापूर्वी ज्या कन्येचा विवाह लावला जात असे त्याला बालविवाह असे म्हणत. (अळतेकर, २०१६, पृ.१२०). स्त्रीने ऋतु प्राप्त झाल्यावर विवाह केलाच पाहिजे, त्याशिवाय तिला स्वर्गाचे दार खुले होणार नाही. जो पिता, माता, किंवा जेष्ठ भ्राता आपल्या कन्येचा विवाह ८ व्या वर्षी करणार नाही तो नरकात जाईल असे मनू म्हणतो. वायाजाणा-या प्रत्येक ऋतु बरोबर एक-एक भ्रुणहत्येचे पातक लागेल असे बजावून ठेवले आहे. (मनुस्मृती अध्याय ९, पृ.९०-९१). म्हणुनच चालुक्य कन्येचा विवाह गोव्याच्या कदंब राजकुमाराशी बाल्यावस्थेतच झाला होता.

मुलगी वयात आल्या नंतर एखादया पुरुषाच्या वासनेला बळी पडू नये, किंवा स्वत: मोहात पडून बदनाम होवू नये म्हणून मुलीचा वयात येण्यापुर्वीच विवाह केल्या जाई. **(**भट्टाचार्य, २०१०, पृ.१०२-१०३**).** पुढे पुढे विवाहाचे वय कमी कमी होत जाऊन पाळण्यातील मुलामुलींचे विवाह लावून दिले जात**.** महाराष्ट्रात तर "पोटाला कुंकु लावणे" म्हणजे दोन गरोदर स्त्रीयां पैकी एकीला मुलगा व दुसरीला मुलगी होईल, असे गृहीत धरुन लग्न ठरवले जाई**.** (आपटे, २०१९, पृ.२१०-२११).

**विधवाविवाह विषयक**

प्राचीन काळात स्त्रिला समाजात व कौटुंबिक व्यवस्थेत जे काही मानाचे स्थान व कौटुंबिक दर्जा प्राप्त होता तो केवळ एखादयाची पत्नी म्हणूनच मिळत असे. स्त्रीच्या जीवनाचा आधार केवळ तिचा पती असे**;** त्यामुळे पतीच्या मृत्युनंतर तिच्या पुनर्विवाहावर कठोर प्रतिबंध लादण्यात आले होते. (अळतेकर, २०१६, पृ.१२४-१२६)**.** महिलाच्या लैंगिक शुचितावर भर देण्यसाठी विधवा विवाहास नकार देण्यात आला. बृहस्पतीनुसार विधवानी आजन्म ब्रह्मचर्याचे पालन करावे**,** व्रत, उपवास, तप, दान करावे किंवा सती जावे, परंतु पुनर्विवाह करु नये असे धार्मिक बंधन लादण्यात आले होते. (भट्टाचार्य, २०१०, पृ.११८).

अल्बेरुनीने तारिख-ए-हिंद मध्ये निरीक्षण नोंदवले आहे की, विधवांचा पुनर्विवाह धार्मिक प्रथेनूसार प्रतिबंधित होता. उच्चजाती आणि उच्चवर्गीय कुटुंबामध्ये विधवांच्या पूनर्विवाहावर बंधने होती. या काळामध्ये विधवांची स्थिती चांगली नव्हती पती गमावल्यानंतर स्त्रीला सामाजिक जीवनात तुच्छ स्थान दिले जाई व तिच्यावर अनेक धार्मिक-सामाजिक बधंने लादली जात. (बाशम, २०१४, पृ.१९२).

**सतीप्रथा**

पतीच्या मृत्युनंतर विधवेस मृत पतीच्या चितेवर स्वत:ला जाळून घेऊन सहगमन करावे अशी धार्मिक सक्ती केली जात असे, यावेळी अंग पोळत असता जिवाच्या मोहाने शरीराचा दाह कमी करण्यासाठी ती चितेवरुन पळून जाण्याचा प्रयत्न करी, परंतू कुटुंबिय किंवा समाजातील काही व्यक्ती तिला जबरदस्तीने सरणात लोटून तिचा जीव घेत असे. (अळतेकर, २०१६, पृ. १८०-१८३). विधवेने सती जाणे म्हणजे सर्वोच्च पवित्रता प्राप्त करणे, असा समज निर्माण करण्यात धर्ममार्तंडानी व पुरोहितवर्गाने मोठी भूमिका बजावली. काही लोभी नातलगांकडून स्त्रीची संपत्ती हडप करण्याच्या हेतुने तिला सती जाण्यास भाग पाडल्याचे उल्लेख समाजशास्त्रीय अभ्यासात आढळतात. (शर्मा, २०१८, पृ. २१०-२११).

**केशवपन**

प्राचीन काळातील कौटुंबिक व्यवस्थेत केशवपन सारखी अमानुष कुप्रथा प्रचलीत होती. पतीच्या मृत्यु नंतर विधवा पत्नीने आपले मुंडण करावे, पांढरे वस्त्र धारण करावे, सौंदर्यालंकार जसे मंगळसुत्र, पंच, पातळ, खण इत्यादी वस्तु ब्राह्मणांना विधिवत दान कराव्या हे तिचे धार्मिक कर्तव्य मानले जाई. याप्रकारे तिचे विद्रुपीकरण करुन तिचा आत्मसन्मान हिरावून घेणे आणि त्याच बरोबर पुरुषप्रधान संस्कृती अधिक मजबूत ठेवण्यासाठी तिचे व्यवस्थित दमन करणे हा या प्रथेचा गाभा होता. महात्मा फुले यांच्यानुसार अशा धार्मिक रुढी आणि कुप्रथा स्त्रियांच्या गुलामीची मुळे अधिक घट्ट करणयाचे काम करीत होत्या. (फुले ,१९६६, पृ.११८).

**भृणहत्या**

पितृसत्ताक कुटुंब पध्दती प्रचलीत असल्यामुळे वंश हा पित्याच्या नावाने आणि त्याच्यापासून जन्माला आलेल्या पुत्राच्या नावाने ओळखला जाई. "पुत्र हा वंशाचा दिवा आहे; तो अंत्यसंस्कार करतो आणि त्याद्वारे पित्यास मोक्ष मिळतो" त्यामुळे मुलाला जन्म देण्यात धन्यता मानली जाई तर मुलीचा जन्म अनिष्ठ मानला जाई. (अळतेकर, १९५६, पृ.२८९). अथर्व वेदानुसार "हे परमेश्वरा तू हा गर्भ बनवला आहेस, त्यातून मुलाचा जन्म होऊदे, स्त्री काय कुठेही जन्माला येईल." (अथर्ववेद कांड ६, सुक्त ११, मंत्र ३,पृ.२८९ ). यावरुन असे दिसून येते की, तत्कालीन कुटुंब व्यवस्थेत मुलाचा जन्म हा मात्यापित्यासाठी आनंद तर मुलीचा जन्म म्हणजे जणु ओझेच. विधवा पुनर्विवाहावर असलेली कडक बंदी आणि त्यातून जन्माला आलेल्या सामाजिक निंदेमुळे काही ठिकाणी नवजात बालिकेचा जन्म झाल्यास तिला जीवदान न देता मारुन टाकले जाई. (अळतेकर, १९५६, पृ.११०).

**वारसा हक्क**

पितृसत्ताक कौटुंबिक व्यवस्थेत संपत्तीचे सर्व अधिकार व प्रशासकिय सत्ता कुटुंब प्रमुख असलेल्या पुरुषाकडे केंद्रित होती. यजूऋवेदातील तैतरीय संहितेमध्ये "स्त्रीयामध्ये कार्यशक्ती नसते म्हणून त्याना संपत्ती मध्ये हिस्सा देऊ नये" असा उल्लेख आढळतो. (तैतरिय संहिता, पृ.४१२). मिताक्षरा व दयाभाग या दोन प्रमुख हिंदू वारसाहक्काच्या कायदयानुसार मुलाला त्याच्या जन्मापासूनच संपत्तीत जन्मसिध्द हक्क प्राप्त होई. मिताक्षरा संहितेत "मुलगा, त्याचा मुलगा, आणि त्याच्या मुलाच्या मुलाला वारसाहक्क प्राप्त होतो असे स्पष्ट नमुद आहे." (काणे, १९४१, पृ.५३२). मनुच्या मतानुसार पत्नी, पुत्री आणि दास याना मालमत्तेचा कोणताही हक्क नाही.

(मनुस्मृती, ९.१०४. पृ.३५५). पितृसत्ताक कुटुंबपध्दतीमुळे पित्याच्या संपत्तीचा वारसा हा जेष्ठ पुत्राकडेच जात असे, जेष्ठत्वाच्या आधारे संपत्तीचे विभाजन आणि अधिकार निश्चित केले जात, त्यामुळे जेष्ठ मुलाला प्रमुख वारसाहक्क मिळे. (अळतेकर, १९५६, पृ.९२).

**हुंडा**

प्राचीन काळात विवाहावेळी मुलीचे वडील वरास वरदक्षिणा म्हणून संपत्ती, धन, जमीन, मौल्यवान वस्तू आणि जनावरे देण्याची प्रथा होती. रामायणात सीतेच्या विवाहावेळी राजा जनकाने विपुल द्रव्यसंपत्ती, रत्ने, आणि दास-दासीचे दान केले असल्याचा उल्लेख आहे. (रामायण, बाल कांड, पृ.७८). मुलगी उजवली नाही तर ती आयुष्यभर आई-वडिलांवर ओझे राहील, या भितीने वरपक्ष संपत्तीची लालसा दाखवून विवाहात दान-धनाची अपेक्षा ठेवत असे. पुढे ही प्रथा सर्वमान्य होवून हुंडयाशिवाय लग्न न करण्याची अनिष्ठ प्रथा जन्मास आली. (अळतेकर, १९५६. पृ.२१५).

**घटस्फोट**

भारतात पितृसत्ताक कुटुंबपध्दती प्रचलित असल्यामुळे स्त्रीला जोडीदारापासून विभक्त होण्याची कोणतीही औपचारिक व्यवस्था प्राचीन काळातील कौटुंबिक व्यवस्थेत दिसत नाही. पती कितीही वाईटप्रवृत्तीचा, दुराचारी किंवा व्याभिचारी असला तरी "पती परमेश्वर समजून" स्त्रीने आजन्म विवाह बंधनातच राहावे व पती सेवा करावी ज्यामळे स्त्रीला मोक्ष प्राप्त होतो असा समज प्रचलित होता. (अळतेकर, १९५६, पृ.२१२). विवाह ही एक धर्मसंस्था मानली जात होती आणि ते अविनाशी बंधन मानले जाई त्या मुळे घटस्फोटाची प्रथा अस्तित्वात नव्हती. याज्ञवल्क्यस्मृती नूसार "विवाह एकदा झाला की तो मोडता येत नाही; परंतू पूरुषास आवश्यक वाटल्यास तो पत्नीचा त्याग करु शकतो असे स्पष्ट विधान आढळते." (याज्ञवल्क्यस्मृती, १.७३, पृ.४५).

**महिलांच्या कौटुंबिक भूमिकेत बदल घडवणारे घटक**

**शैक्षणिक सुधारणा**

शिक्षण हे परीवर्तनाचे एक महत्वपूर्ण माध्यम आहे, प्राचीन काळात स्त्री शिक्षणावर कठोर बंधने होती, मुलीना गुरुकुलात प्रवेश नव्हता. महात्मा फुले यांनी या अंध परंपरेला प्रथम आव्हान दिले. १८४८ मध्ये त्यानी पुण्यात मुलींसाठी पहीली शाळा सुरु केली. सावित्रीबाई फुले यानी शिक्षकेची जबाबदारी स्वीकारुन समाजपरीवर्तनाची ऐतिहासिक पायाभरणी केली. (फडके, २०१७, पृ.११२-११८).

१८५७-१९५८ पर्यंतचा कालखंड लक्षात घेता स्त्री शिक्षणाचा प्रसार आणि प्रसार ब्राह्मण वर्गापूरताच मर्यादीत न राहता बहुजन समाजा पर्यंत पोहोचला. (दामले. १९९४, Cultural Revolt in a Colonial Society, पृ.६७-७२). भारत सरकारने २००९ साली मोफत आणि सक्तीचे शिक्षण कायदा लागू केला आणि ६ ते १४ वयोगटातील मुला-मुलीना शिक्षणाचा मूलभूत अधिकार मिळाला. मुलींसाठी विविध शिष्यवृत्ती व शैक्षणिक प्रोत्साहन योजना सुरु झाल्या. (भारत सरकार,२०१० शिक्षण मंत्रालय अहवाल, पृ.१४-२२). २००९ पर्यंत देशात ५७६ जवाहर नवोदय विदयालये कार्यरत होती ज्यात सहशिक्षणावर भर दिला होता. शैक्षणिक दृष्टया मागास भागातील मुलींसाठी कस्तुरबा गांधी बालीका विदयालय योजना राबविण्यात आली. २०१२ पर्यंत ३.६ लाख मुलीनी येथे शिक्षण घेतले. (KGBV वार्षिक अहवाल, २०१२, पृ.५-९).

**कायदेविषयक सुधारणा**

कायदयातील सुधारणामुळे स्त्रींयाच्या भूमिकेत बदल घडून आले, हिंदु विधवा पुनर्विवाह कायदा, १८५६ ने विधवेला पूनर्विवाहाचा अधिकार दिला. (जोशी, २००९, पृ.९८). बालविवाह प्रतिबंधक कायदा, १९२९ द्वारे मुलींच्या विवहाचे किमान वय १४ वर्षे निश्चित करणयात आले त्यात सुधारणा करुन २००६ च्या बालविवाह प्रतिबंधक कायदयाने १८ वर्षाखालील मुलींच्या बालविवाहावर प्रतिबंध घालण्यात आला. हिंदु विवाह अधिनियम, १९५५ हिंदु उत्तराधिकारी अधिनियम, १९५६ या सारख्या कायदयांनी स्त्रीयांना विवाह, घटस्फोट, आणि वारसा बाबतीत मूलभूत अधिकार मिळाले. हुंडा प्रतिबंधक अधिनियम, १९६१ नुसार हुंडा देणे व घेणे गुन्हा ठरवण्यात आला. कौटुंबिक हिंसाचार प्रतिबंधक अधिनियम, २००५ ने स्त्रीयांना घरगुती हिंसाचारापासून संरक्षण मिळाले. (भारत सरकार, २००६, पृ.३-५-७). लैंगिकशोषण प्रतिबंधक अधिनियम, २०१३ ने स्त्रीयांना कामाच्या ठिकाणी होणा-या शोषणा पासुन संरक्षण मिळाले. या सर्व कायदयांमुळे भारतीय स्त्रीयांच्या सामाजिक, वैयक्तीक आणि कौटुंबिक स्थितीत मोठे परिवर्तन घडले.

**संविधानिक तरतुदी**

भारतीय राज्यघटनेत स्त्रीयांच्या संरक्षणासाठी व सर्वांगीण विकासा साठी विशेष तरतुदी केल्या आहेत.

अ) कलम १४ अन्वये कादयाने सर्वाना समान संरक्षण. (Constitution of India, 1950, Art.14).

ब) कलम १५ अन्वये स्त्री-पुरुष या आधारावर कोणताही भेदभाव केला जाणार नाही. (Constitution of India, 1950, Art.15).
क) कलम १६ अन्वये सर्वांना समान संधी स्त्री-पुरुष या आधारावर नेमणूकी पासून वंचित ठेवता येणार नाही.
ड) कलम ३९(क) अन्वये उपजिविकेचे साधन मिळवण्याचा स्त्री पुरुषाना समान अधिकार आहे.
इ) कलम ३९(घ) अन्वये स्त्री-पुरुषाना समान कामासाठी समान वेतन. (Constitution of India, 1950, Art.39).
ई) कलम ४४ समान नागरी कायदा. (Constitution of India, 1950, Art.44).
उ) कलम ५१ अन्वये पंचायतराज व्यवस्थेत महीलांसाठी १/३ जागाच्या आरक्षणाची तरतुद. (Constitution of India, 1950, Art.243D).

## हिंदु कोड बिल

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्त्री-पुरुष समतेसाठी आणि पितृसत्ताक व्यवस्थेत सुधारणा करण्यासाठी हिंदू कोड बिल मांडले. त्यातील प्रमुख तरतुदी पुढील प्रमाणे;

- विवाह विषयक :- हिंदु कोड बिलाच्या दुस-या भागात विवाहासंदर्भात नियम स्पष्ट करण्यात आले. विधिपुर्वक झालेल्या आणि नोंदणीकृत विवाहाला वैधानिक मान्यता देण्यात आली. (Government of India, 1955-56, p.22).
- आंतरजातीय विवाह :- जातीबाहेर केलेला विवाह अवैध मानण्याची प्रथा रद्द करुन आंतरजातीय विवाहाना मान्यता देण्यात आली.
- लग्न बेकादेशीर ठरवणे :- कलम २८ आणि २९ नुसार जोडीदारापैकी एखादा मानसिक किंवा शारीरिकदृष्ट्या अक्षम असल्यास विवाह अवैध ठरविण्याची तरतुद. (Government of India, 1955-56, p.27).
- घटस्फोट:- हिंदू महिलांना प्रथमच स्वतंत्रपणे घटस्फोट घेण्याचा अधिकार मिळाला. क्रुरता, पतीचा दुराचार, परित्याग इत्यादी कारणांनी घटस्फोटाची तरतूद.
- वारसा हक्क :- मुलगी, पत्नी, आई याना मालमत्तेवर समान हक्क देण्यात आला. (Government of India, 1955-56, p.34).
- दत्तक :- दत्तक घेण्यास व  देण्यास पतीने पत्नीची संमत्ती घ्यावी अशी तरतुद केली.
- दुस-या विवाहास बंदी:- पहिले लग्न कायम असेल आणि दुसरे लग्न केल्यास ते बेकायदेशीर.
- पोटगी:-विवाहीत स्त्रीला पतीकडून पोटगी मिळवण्याचा वैध हक्क देण्यात आला. (Government of India, 1955-56, p.55).

## स्त्री चळवळी

भारतातील स्त्री चळवळीने स्त्रीयांच्या भूमिकेत बदल घडविण्याचा प्रयत्न केला. १८४८ साली महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले यानी पुण्यात मुलींच्या शिक्षणासाठी पहिली शाळा सुरु करुन स्त्री चळवळीचा पाया रचला. (कोसांबी, १९९३, पृ.८७). १८८२ मध्ये पंडिता रमाबाई यानी विधवा, निराधार महीलासाठी शारदा सदन ची स्थापना करुन सामाजिक कुप्रथांच्या निर्मुलनाचे प्रयत्न केले. (देसाई, २००५, पृ.११२). १९०४ च्या भारतीय महिला परिषदेच्या माध्यमातून सतीप्रथा, बालविवाह, बहुपत्नीत्व इत्यादी स्त्री-शोषण करणा-या प्रथावर चर्चा होवून समाजजागृती निर्माण झाली. (कोसांबी, १९९३, पृ.१३५). १९८० नंतर स्त्री चळवळ अधिक संघटीत झाली त्यात हुंडाबळी, घरगुती हिंसाचार, बलात्कार, समान वेतन हे मुद्दे प्रमुख होते. पुढे दिर्घ संघर्षानंतर पंचायतराज संस्थेत ३३% आरक्षण लागू झाले.

## आधुनिक कुटुंबातील महिलांच्याबदलत्या भूमिका

## शिक्षित व ज्ञानी

आधुनिक कुटुंबातील महिलांची भूमिका बदलण्यामध्ये शिक्षणात प्रवेश हा घटक महत्वाचा ठरला. गेल्या काही दशकांमध्ये महिलांच्या साक्षरतेच्या प्रमाणात लक्षणीय वाढ झाली असून उच्च शिक्षणात त्यांचा सहभागही मोठ्या प्रमाणावर वाढलेला दिसून येतो. १९५१ मध्ये भारतातील महिला साक्षरता दर केवळ ८.९% होता; परंतू तो २०१७-२०२१ दरम्यान वाढून सुमारे ७०.३% इतका झाला. (CSSE, 2024, p.5). राष्ट्रीय सर्वेक्षण २०२१-२२ नुसार उच्च शिक्षणात महिलांचा सहभाग ४९% इतका झाला. दिर्घकाळपासून अस्तित्वात असलेल्या लिंग आधारीत रूढी मोडीत निघत आहेत. वैधकशास्त्र, अभियांत्रिकी, कायदा, आणि व्यवसाय यासारखी क्षेत्रे जी पूर्वीपूरुषप्रधान मानली जात होती, त्यात आता महिलांचा लक्षणिय सहभाग दिसून येतो.

## स्वावलंबी आणि आर्थक स्वयंपुर्ण

e-ISSN No. 2394-8426
Special Issue on Humanities And Indian Knowledge System Feb'26
Issue–I(I), Volume–XIV

आधुनिक काळातील महिला अर्थाजन करण्यासाठी कौटुंबिक चौकटी बाहेर जावून नोकरी, व्यापार, आणि उघोगक्षेत्रात सक्रिय सहभाग घेत असल्यामुळे ती आर्थिक दृष्टया स्वयंपुर्ण व स्वावलंबी होत आहे. नीति आयोगाच्या २०२२ च्या अहवालानुसार भारताच्या GDP मध्ये महिलांचा वाटा १८% आहे. (निती आयोग, २०२२, पृ.४१)

Periodic Labour Force Survey, 2022 नुसार ग्रामिण भागातील २७% महिलांचा तर शहरी भागातील १९% महिलांचा कामकाजात सहभाग आहे. (कामगार मंत्रालय, २०२२ ,पृ.६७). बँकिंग, शिक्षण आरोग्यसेवा, उदयोजकता या क्षेत्रात महिलांचा सहभाग झपाटयाने वाढला आहे. आयटी क्षेत्रात काम करणा-या एकूण कर्मचा-यापैकी ३६% या महिला आहेत. (NASSCOM, 2021, p.23). भारतात ७ कोटी पेक्षा जास्त महिला स्वयंसहय्यता बचत गटाच्या माध्यमातून आर्थिक स्वावलंबन करीत आहे. (NRLM Report, 2023, p.12).

**निर्णयघेणारी**

महिलांना शिक्षणात प्रवेश मिळाल्यामुळे अधिकाराची जाणिव झाली, निर्णयक्षमता विकसित झालयामुळे कौटुंबिक निर्णयप्रक्रियेत त्यांची भूमिका महत्वपुर्ण बनली आहे. घर बांधणे, मुलांचे शिक्षण, बँकेत गुंतवणूक, आरोग्याशी संबधित निर्णय अशा अनेक बाबतीत महिलांचे मत निर्णायक ठरत आहे. NFHS-5 २०१९-२१ च्या अहवालानुसार ८५% विवाहीत स्त्रीया घरगुती खरेदीच्या व्यवहारात निर्णायक भूमिका पार पाडतात. (NFHS-5, 2019-21, p.312). ७५% महिला स्वतःच्या आरोग्यविषयी निर्णय घेऊ शकतात. ६७% महिलानी कुटुंबनियोजन संदर्भात निर्णय प्रक्रियेत महत्वाची भूमिका पार पाडली. (NFHS-5, 2019-21, p.254). हि आकडेवारी स्पष्टपणे दर्शविते की, आधुनिक कुटुबात महिला निर्णय घेण्याच्या प्रक्रियेत केंद्रस्थानी येत आहे.

**कौटुंबिक कार्य पार पाडणारी**

आधुनिक स्त्री ही कुटुंबात विविध भूमिकांमध्ये कार्यरत आहे. आई म्हणून मुलासाठी आदर्श, पत्नी म्हणून सहकारी, तर बहिण म्हणून मदत करणारी अशी तिची पारंपारीक ओळख आहे. गेल्या काही दशकापासून महिला घरगुती जबाबदा-या आणि करिअर यामध्ये संतुलन साधत समर्थपणे कौटुंबिक भूमिका पार पाडत आहे. तरीही भारतातील महिलांवर घरकामाची जबाबदारी अधिक प्रमाणात दिसून येते. Time Use Survey 2019 नुसार ९२.९% महिला दररोज घरकाम करतात, महिला दिवसातून सरासरी ३०५ मिनिटे घरकामावर खर्च करतात, तर पुरुष फक्त ८६ मिनिटे घरकामासाठी देतात. (NSSO, 2019, p.51).

**सामाजिक भान ठेवणारी**

आधुनिक स्त्री ही समाजातील विविध जबाबदा-या समर्थपणे पेलत आहे, ती कुटुंब, संस्कृतीचे संरक्षण करणारी, नैतिक मुल्यांचे मार्गदर्शन करणारी, घरातील विविध पंरपरा, सण-समारंभ पार पाडणारी, धार्मिक रिती-रिवाजात भाग घेऊन त्यात काळानुसार बदल घडविणारी आहे. आधुनिक स्त्री गरीब व वंचित घटकाना मदत करणारी, पर्यावरणाचे रक्षण आणि महिलांच्या हक्कासाठी लढणारी म्हणून विविध सामाजिक प्रश्नामध्ये सक्रिय सहभाग घेते. UN Women, 2021 च्या अहवालानुसार भारतातील ५२% महिला विवध सामाजिक किंवा सामुदायीक उपक्रमामध्ये सक्रिय आहेत. (UN Women, 2021, p.22). तसेच नविन तंत्रज्ञानाचा वापर करुन ते पुढील पिढी पर्यंत पोहोचवते आणि मुलाना चांगले वाईटची समज देऊन त्यांच्यात प्रामाणिकपणा, त्याग, करुणा, सहनशिलता व नैतिक गुणांचे बीजारोपण करत आहे.

**नाती आणि जबाबदारी सांभाळणारी**

आधुनिक स्त्री ही कुटुंबातील आई, बहीण, पत्नी, मुलगी, सुन अशा विविधांगी भूमिका सक्षमपणे पार पाडत आहे. तिच्याकडे असलेले शिक्षण, तंत्रज्ञानाचे ज्ञान, विविध कौशल्य व सवांदकौशल्य यांच्या जोरावर ती समजुतदारपणे सर्व कौटुंबिक नाती सांभाळते. नाती सांभाळताना ती उत्तम माता, कुशल सहकारीणी, घर सांभाळणारी जबाबदार व्यक्ती तसेच माणूसकी आणि मान-सम्मान जपणारी अशी बहुआयामी भूमिका चोख पार पाडते. आधुनिक स्त्री ही कुटुंबातील मुल्यव्यवस्था, संस्कृती आणि भावनिक घटक टिकवून ठेवण्यात महत्वाची भूमिका बजावते. (शर्मा, २०२०, पृ.११२).

**स्वत:ची ओळख निर्माण करणारी**

आधुनिक काळातील स्त्री ही केवळ माता, पत्नी, बहीण किंवा मुलगी या पारंपारीक नात्या पुरती सिमित न राहता ती स्वत:ची स्वतंत्र ओळख निर्माण करण्याच्या दिशेने आत्मविश्वासाने पुढे जात आहे. नवनविन ज्ञान, कौशल्ये, उच्चशिक्षण आत्मसात करुन नोकरी, उदयोजक, सैनिक, वकील, पत्रकार, आयटी आणि वैदयकिय अशा विविध क्षेत्रात आपला ठसा उमटवित आहे. स्त्रिया अर्थव्यवस्थेला नविन दिशा देत आहे, विविध क्षेत्रामध्ये सर्जक, नवोन्मेषक, आणि निर्णयकर्त्या म्हणून त्यांची भूमिका मोठया प्रमाणात वाढत आहे. (निती आयोग, २०२५, पृ.७).

**न्यायासाठी आवाज उठविणारी**

आधुनिक भारतीय स्त्री ही अन्याया विरोधात आवाज उठवणारी, सामाजिक बदल घडवणारी, आणि मानवाधिकाराच्या लढ्यात सक्रियपणे भूमिका निभावणारी आहे. पर्यावरण, महिला हक्क, हुंडा, लैंगिक अत्याचार, वेतन असमानता, स्थानिक स्वराज्य, तसेच सामाजिक न्याय यासारख्या प्रश्नावर महिलांनी व्यापक प्रमाणात आंदोलने केली आहे. चिपको आंदोलनात ग्रामिण महिलांनी जंगल रक्षणासाठी थेट संघर्ष केला, ज्यामुळे महिला ही पर्यावरण व न्यायाच्या लढयाची केंद्रस्थानी असते असे अधोरेखीत झाले. (Asian Studies, 2023.p.2). १९७५-१९८० या दशकात महिलांनी हुंडाबळी, बलात्कार, आणि कौटुंबिक हिंसाचार विरोधात मोठया प्रमाणावर मोर्चे काढले आणि कायदयात बदल घडवून आणले. (Miloonsaryajani, 2025, p.4).

**महिलांच्या बदलत्या भूमिकेपुढील आव्हाने**

**घर आणि करिअर यातील संतुलन**

घर आणि करिअर यातील संतुलन साधतांना कामकाजी महिलाना अनेक प्रकारच्या अडचणींना सामोरे जावे लागते. ILO (2020) च्या अहवालानुसार भारतीय महिला दररोज सरासरी ६ तास नि:शुल्क घरकाम करतात तर पगारी कामासाठी केवळ २.५ तास देतात. याउलट पुरुष केवळ १ तास घरगुती काम करत असून ७ तास पगारी काम करतात. घर आणि करीअर अशा दुहेरी जबाबदा-या सांभाळताना स्त्रीयांवर मानसिक दडपण येऊन त्यातून चिडचिडेपणा, ताण-तणाव, नैराश्य, एकटेपणाची भावना, असुरक्षितता सारख्या समस्याना सामोरे जावे लागत आहे. (ILO, 2020, p.27).

**पारंपारिक मानसिकता**

भारतीय समाज अदयाप पुरुषप्रधान मानसिकतेतून बाहेर आलेला नाही. स्त्री-पुरुष असमानता सामाजिक, आर्थिक तसेच कौटुंबिक पातळीवर मोठया प्रमाणावर  दिसून येते. आजही घरगुती कामे ही स्त्रीयांची नैसर्गिक जबाबदारी मानली जाते, तर पुरुषानी घरकाम करणे हे अपुरुषत्वाचे लक्षण म्हणून पाहिले जाते; ही पांरपारिक पुरुषी मानसिकतेची देण आहे. NFHS-5 (2020-21) च्या आकडेवारीनुसार भारतात आजही मोठया प्रमाणावर स्त्रियांवर शारीरिक, मानसिक आणि भावनिक हिंसा होते तर काही समुदायामध्ये तर ऑनर किलिंग सारख्या घटना स्त्रीचे स्वातंत्र प्रतिबंधित करण्याचे उदाहरण आहे. (NFHS-2021, p.79-82).

**लैंगिक असमानता**

भारतात लैंगिक असमानता ही गंभीर सामाजिक समस्या आहे. पितृसत्ताक विचार सरणी मुळे स्त्रीयांना शिक्षण, रोजगार, वेतन आणि निर्णयप्रक्रिया सारख्या क्षेत्रात मर्यादित संधी मिळतात. WEF च्या Global Gender Gap Report 2023 नुसार आर्थिक सहभागातील लिंग समानता भारतात फक्त ३६.७% आहे, कमाईतील लिंगभेद ४८.१% आहे (WEF,2023.p.116-117). कामगार सहभागदरातही मोठी दरी आहे. भारत सरकारच्या Female Labour Utilization Report 2023 नुसार महिलांचा LFPR केवळ ३२.८% नेतृत्व आणि निर्णयप्रक्रियेतही महिलांचे प्रमाण कमी आहे. (GoI, 2023, p.12).

**कामाच्या ठीकाणी छळ**

भारतात कामाच्या ठिकाणीमहिलाना वेतनभेद, पदोन्नतीतील मर्यादा, नेतृत्वातील कमी प्रतिनिधित्व आणि असुरक्षितता यांचा सामना करावा लागतो. अवांछित स्पर्श, टिप्पण्या, इशारे आणि अनुचित शेरेबाजीचा रोजच सामना करावा लागतो. Indian Bar Council Survey 2017 च्या आकडेवारी नुसार भारतातील सुमारे ७० टक्के महिलाना कामाच्या ठिकाणी छळाचा अनुभव येतो पण त्यातील फक्त २५ टक्के महिलाच तक्रार करतात. (Indian Bar Council Survey, 2017, p.12).

**आर्थिक असुरक्षितता**

भारतातीय महिलांच्या दीर्घकालीन आर्थिक सुरक्षिततेत मोठी दरी दिसते. साधनसंपत्ती, बचत किंवा मालकी हक्का संबंधी दीर्घकालीन तरतूद दिसून येत नाही. NFHS-5 च्या अवालानुसार केवळ १३% महिलांकडे घराची एकटयाने मालकी आहे, तर जमिनीची मालकी केवळ ८.३% महिलांकडे आढळते (UNFPA, 2023, p.2). India gender Report 2024 नुसार २०२०-२१ मध्ये महिलांची स्वंयरोजगारातील कमाई पुरुषांच्या तुलनेत फक्त ४१% होती.

**सामाजिक दबाव**

भारतीय समाजातील पारंपारिक लिंगनियम आणि कुटुंबाच्या दबावामुळे मुलीना शिक्षण आणि करिअर निवडीत अनेक मर्यादा येतात. युनिसेफ २०२४ च्या अहवालानुसार २६% मुलीना शिक्षणा नंतर विवाहाकरीता दबाव जाणवतो (UNICEF-YuWaah Survey, 2024). याशिवाय Indian Social Development Report २०२३

https://doi.org/10.69758/GIMRJ/2601S01V14P101
e-ISSN No. 2394-8426
Special Issue on Humanities And Indian Knowledge System Feb'26
Issue–I(I), Volume–XIV

नुसार भारतातील पितृसत्ताक सांस्कृतिक मूल्ये आणि कठोर लिंगनियम मुलीच्या उच्चशिक्षण व रोजगाराच्या संधीना मर्यादित करते.

**कौटुंबिक आधाराचा अभाव**

भारतात महिलांच्या शिक्षण आणि करिअर निवडताना सर्वात मोठा अडथळा म्हणजे कुटुंबाकडून पुरेसा आधार न मिळणे. पितृसत्ताक भूमिकेमुळे स्त्रीयांच्या करिअर निवडीवर घरातील पुरुष सदस्य नियंत्रण ठेवतात, लिंगाधारीत कामविभाजनामुळे महिलांना करिअर मध्ये पुढे जाण्यास कुटुंबियांचा आधार कमी मिळतो. (Nikore, 2020, p.1979).

**निष्कर्ष आणि उपाययोजना**

प्राचीन काळात स्त्रियांना कुटुंबात दुय्यम स्थान देवून शिक्षण, विवाह, संपत्ती यासारख्या मूलभूत अधिकारापासून वंचित ठेवले गेले. मात्र शिक्षण, सामाजिक सुधारणा आणि संविधानिक तरतुदीमुळे महिलांमध्ये अधिकाराची जाणिव वाढली व त्या विविध क्षेत्रात महत्वपुर्ण योगदान देऊ लागल्या.

आजही महिलांना कामाच्या ठिकाणी लैंगिक भेदभाव, असमान वेतन, शारीरिक-मानसिक छळ, तसेच कुटुंब व करिअर यात संतुलन साधतांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागते. तरीही या बदलत्या कुटुंबव्यवस्थेत महिलांची भूमिका सकारात्मक परिवर्तनाचे प्रतीक आहे.

या अडथळयावर मात करण्यासाठी कुटुंब, समाज, सरकार व खाजगी संस्था यांचे सयुक्त प्रयत्न आवश्यक आहे. शिक्षण, आर्थिक स्वावलबंन, आरोग्य, सुरक्षितता, सामाजिक संरक्षण आणि कायदेविषयक जागृती यासारख्या प्रभावी उपाययोजनामुळे महिलांचा सर्वांगीन विकास होईल आणि त्या कुटुंब आणि समाजात अधिक सक्षमपणे भूमिका निभावू शकतील.

**संदर्भ सूची**

Ambedkar, B .R. (1979). Dr. Babsaheb Ambedkar: Writinges and speeches (Vol.1). Government of Maharashtra.
Ambedkar, B. R. (1994). Shikshan-vichar,Mumbai: Prabhkar Prakashan
Ambedkar, B. R. (1995). Dr. Babsaheb Ambedkar: Writinges and speeches (Vol.14, pp.347-359). Government of Maharashtra.
Apte, D. (2010). Bhartiya Sanskruti cheitihas. Pune: Continental Prakshan.
Atharvaveda. (Trans). (Book & page number noted: 6.11.3; p.289).
Altekar, A. S. (1955). The Position of Women in Hindu civilization. Delhi: Motilal Banarasidass.
Altekar, A. S. (2018). The Position of Women in Hindu civilization. Delhi: Motilal Banarasidass.
Asian Studies Association. (2023). Activismandwomens rights in India. Asian Studies Association.
Basham, A. L. (2014). The wonder that was India. New Delhi; Picador.
Buhler, G. (1886). The laws of Manu (G. Buhler,trans.). In Sacred Books of the East (Vol.25, pp.182-193, 319). Oxford University Press.
Bhattacharya, N .N. (2020). Ancient Indian education, Delhi; Motilal Banarsidass.
Desai, A. R. (1976). Social Background of Indian nationalism (pp.112-115). Popular Prakashan.
Desai, P. N. (2020). Bhartiya SamajikSanstha.Mumbai; Pune Publishing House.
Dhamle, G. (1994). Clutural revolution in colonial society. Pune; Continental Prakshan.
Government of India. (1950). Constitution of India. New Delhi.
Government of India. (1055-56). Hindu code Bill. Ministry of law.
Kane, P. V. (1962). Histroy of Dharmsastra (vol.I, Part I. pp.370-372; vol.II, pp.734-736). Bhandarkar Oriential Research Institute.
Kosambi, M. (1993). Women in Indian History. New Delhi; Blackswan.
Mahabharata. (AnushsanaParva). Critical Edition.
Ministry of Education. (2012). Kasturba Gandhi Balika Vidyalaya; Annual report, Government of India. (p.67). Government of India.
Manusmriti. (Chapters & verses noted; G. 104, H 305)

https://doi.org/10.69758/GIMRJ/2601S01V14P101
e-ISSN No. 2394-8426
Special Issue on Humanities And Indian Knowledge System Feb'26
Issue–I(I), Volume–XIV

National Family Health Survey (NFHS-5). (2019-21). India report, Ministry of Health and Family welfare.
Niti Aayog. (2022). Women and economy report (p.41). Government of India.
Phadke, Y.D.(2017). Mahatma Phule; Charitra parva, Sugava Prakshan.
Phule, J. (1860). Sarvajanik Satyadharma, Maharashtra Rajya Sahitya Sanskruti Mandal.
Shrama, R. N. (2007). Indian social structure and change (pp.52-54). Atlantic Publisher.
Shrama, P. C. (2016). Indian family system and values; New Delhi; Sage.
Spencer, H. (1876). The principles of sociology, (pp.416-417). Appleton.
Valmiki, Ramayana (Bala Kanda). (Gita press Edition).
Yajnavalkya Smriti (1962). In P.V. Kane (Ed.), History of Dharmasastra (Vol.II, Part-I, pp.370-372). Bhandarkar Oriential Research Institute.